सकाळ
• www.eSakal.com
शनिवार, १८ नोव्हेंबर २००६



## जागतिक विक्रम

मानवी शक्तीच्या जोरावर जेसनने आतापर्यंत ३५ हजार मैल अंतर पार केले आहे. त्यातील १४ हजार मैलांचा प्रवास केवळ समुद्रातील आहे. शिडशिडीत गोरा बांधा, सुमारे सहा फुटांची उंची आणि कोणालाही थक्क करून सोडावे अशा या तरुणाचे वय केवळ ३८ वर्षे आहे. जगप्रदक्षिणेचे अनेक विक्रम झाले असले तरी असा हा पहिलाच जागतिक विक्रम आहे.

# यंत्राविना पृथ्वीप्रदक्षिणा!

मुंबई, ता. १७ : पाण्यात पेडल बोट आणि जमिनीवर एकामागे एक असलेली तीनचाकी सायकल असा प्रवास थेट जगाचा. तोही यंत्र आणि हवेच्या साह्याशिवाय. जगातील गिनीज बुकमध्ये विक्रम ठरलेल्या सफरीचा या तरुणाचा मुंबई टप्पा सुरू झाला आहे.

ब्रिटनमधला साहसी तरुण 'जेसन लेविस' याने जगाला प्रदक्षिणा घालण्याचा ध्यास घेतला. १९९४ पासून ० अक्षांश आणि रेखांश असलेल्या लंडनमधील ग्रीनीच मेरिडीअन या शहरापासून प्रदक्षिणेला सुरू झालेल्या या तरुणाचे आता एक तृतीयांशपेक्षाही कमी अंतर पार करायचे राहिले आहे. भारताच्या मुंबई शहरातील तरुणाईला साद घालण्यासाठी तो पाच दिवस येथे वास्तव्य करणार आहे. १३ वर्षांच्या काळात त्याने २२ देशांमधून प्रवेश केला आहे. सिंगापूर-चीन-तिबेट आणि हिमालयमार्गे तो भारतात शिरला, तर मुंबईतल्या समुद्रातून बाहेर पडून सोमालिया-अफ्रिकेमार्गे पुन्हा त्याच्या सुरुवातीचा बिंदू गाठून शेवट करणार आहे. समुद्रप्रवासासाठी लागणारी पॅडल बोट त्याने लाकडाची तयार करून घेतली असून कुठल्याही वादळाशी लढण्यास ती तयार असते. विशेष म्हणजे १३ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर तिचे भारतीय शब्दात 'मोक्ष' असे नामकरण करण्यात आले.